**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १०३/२०२०**
निवृत्ती वि. युवराज
निशाणी क्रमांक ५१ खाली

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक २ नागनाथ येडबा शिरसाठ यांचा शपथेवर पुढील सरतपास विधीज्ञ श्री. डी. ए. निकाळजे यांच्यामार्फत**

१. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

**प्रतिवादी तर्फे उलटतपास विधीज्ञ. श्री. एस. बी. देवकते यांच्याकडून**

२. माझे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. माझी जमीन गट क्रमांक २८२ मध्ये असून माझ्या जमिनीलगत गट क्रमांक ४०४ व ४४१ आहेत. साक्षीदार स्वतः सांगतो की माझ्या व वादीच्या जमिनीच्या लगत इतर दोन गट नंबर आहेत. मला दोन गटाचे क्रमांक सांगता येणार नाहीत. साक्षीदार स्वतः सांगतो की दोन्ही गटे वाघमोडे कुटूंबाचे आहेत. वादी हे कोरोनाच्या आधी सन २०१९ मध्ये मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की वादी क्रमांक २ ते ४ हे मुंबई येथे राहण्यास होते. मी युवराज भिकाजी कोईले यांना ओळखत नाही. माझे त्यांच्याशी कधीही बोलणे झालेले नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद जमिनी निवृत्ती हेळकर यांनी खरेदी घेतलेल्या होत्या. माझ्या जन्माच्या अगोदर वाद जमिनी निवृत्ती हेळकर यांनी खरेदी घेतलेल्या आहेत. वाद जमिनी निवृत्ती हेळकर यांनी कोणाकडून खरेदी घेतलेल्या होत्या याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद जमिनी निवृत्ती व त्यांची पत्नी छबाबाई यांच्या नावे होत्या. सन २००७ साली निवृत्ती व छबाबाई यांनी आर्थिक अडचणीमुळे वाद जमिनी प्रतिवादी यास विक्री केल्याचे मला माहिती नाही. वाद जमिनी विक्री केल्यानंतर प्रतिवादीने निवृत्ती व छबाबाई यांना जमिनी बटईने मशागत करा असे सांगितले होते, याबाबत मला माहिती नाही. सन २००७ पासून निवृत्ती व छबाबाई दोघे हयात असेपर्यंत प्रतिवादी हा बटईचा हिस्सा त्यांना नियमीतपणे देत होता, याबाबत मला माहिती नाही.

४. सन २००९ मध्ये प्रतिवादी क्रमांक २ ते ४ यांनी निवृत्ती व छबाबाई यांच्याविरुद्ध वाद जमिनीचे वाटप होऊन मिळण्याकरिता रे. दि. मु. नं. १९८/२००९ दाखल केला होता, याबाबत मला माहिती नाही. वादी यांच्यामध्ये कोणत्या तारखेला वाटप झाले होते याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांच्या वाटपाच्या वेळी प्रतिवादी हा हजर होता की नाही, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, निवृत्ती व छबाबाईच्या मृत्यूनंतर प्रतिवादीने वादी क्रमांक २ ते ४ यांना वाद जमीन बटईने करण्यास दिलेली आहे.

५. वाद जमिनीच्या गटात किती क्षेत्र आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांच्याशी माझे चांगले संबंध असल्याकारणाने मी आज रोजी त्यांच्या बाजुने खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.02.17 11:26:50 +0530

दिनांकः–१६.०२.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 16-02-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 16-02-2026 |
| Order uploaded on | - | 17-02-2026 |